# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय: पीएच्.डी. प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांपैकी संशोधन कार्य प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीवर भरून त्याची प्रत या कार्यालयाकडे जमा करणेबाबत....**

**संदर्भ: शैक्षणिक प्रवेश विभागाचे पत्र क्र. शै.प्रवेश/३८८१ दिनांक : ०७/१०/२०२६**

आपल्या संशोधन केंद्रात **दिनांक ३१ डिसेंबर, २०२० पूर्वी** विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) अभ्यासक्रमासाठी नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांचे संशोधन प्रलंबित आहे तथा वैयक्तिक किंवा इतर कारणांमुळे विहीत मुदतीत संशोधन कार्य पूर्ण न केलेल्या तसेच संशोधन कार्य सुरू नसलेल्या विद्यार्थ्यांची माहिती पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीमध्ये Student Tracking Audit & Reconciliation या टॅबवर **दिनांक १२ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत** भरून विद्याशाखानिहाय व विषयनिहाय तयार केलेली यादी संशोधन केंद्र प्रमुख व समन्वयक यांच्या सही व शिक्यांसह आणि संशोधन केंद्राच्या पत्रासह संबंधित विद्याशाखांचे मा. अधिष्ठाता यांना अग्रेषित करावी आणि त्याची प्रत मा. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभागास जमा करण्याबाबत उपरोक्त संदर्भीय पत्राद्वारे सर्व संशोधन केंद्रांना कळविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने सर्व संशोधन केंद्रप्रमुख व समन्वयकांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, वरील सर्व प्रक्रिया करण्यास व हार्डकॉपी जमा करण्यास **दिनांक १५ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत** मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच यापुढे कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे )
संदर्भ : शै. प्रवेश/३९३९ )
दिनांक : १२/१०/२०२६ )

(डॉ. दत्तात्रय कुटे)
उपकुलसचिव

**प्रत:**

१. मा. विभागप्रमुख, सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्राचार्य/संचालक, मान्यताप्राप्त संशोधन केंद्रे, प्रस्तुत विद्यापीठ.